सध्याच्या काळात बदललेल्या माध्यमविश्वाच्या अनुरूप वाचनसंस्कृती वृद्धिंगत करायची असेल तर माध्यमांच्या अतिरेकापासून दक्ष राहणे आवश्यक आहे. सध्याचे माध्यमविश्व वाचनसंस्कृती जोपासण्यापेक्षा तिला असुरक्षित करण्यात जास्त लक्ष केंद्रित करताना दिसत आहे. वाचनसंस्कृती जोपासायची असेल, तर माध्यमांचा अतिरेक थांबवावा लागेल. आजच्या काळात लहान मुलांच्या हातात पुस्तकांच्या ऐवजी मोबाईल दिला जात आहे. बालवयापासूनच मुलांना चित्रफितींची ओळख करून दिली जात आहे. बालकांनी एका ठिकाणी स्वस्थ बसावे, एका ठिकाणी बसून जेवन घ्यावे, बालकाचे रडणे थांबावे इत्यादींसाठी पालकांकडून मोबाईलची स्क्रीन हा पर्याय निवडण्यात येतो. बालकांपुढे पुस्तक ठेवण्यापेक्षा मोबाईल देणे पालकांना जास्त सोयीचे वाटते. तरुण, वृद्ध, महिलासुद्धा मोबाईलपासून स्वतःची सुटका करून घेऊ शकल्या नाही असे चित्र पुढे येताना दिसत आहे. अशावेळी वाचनसंस्कृतीच्या वाढीसाठी काही उपाययोजना करणे आवश्यक आहे. ह्या उपाययोजना वैयक्तिक पातळीवर पूर्णत्वाला जाऊ शकतात. जसे समाजमाध्यमांच्या किंवा इतर प्रसारमाध्यमांच्या संपर्कात

 ISSN No. 2394-5990

येण्याची निश्चित अशी एक वेळ आपण ठरवून दिली पाहिजे. इतर वेळी चांगल्या पुस्तकांचे वाचन केले पाहिजे. बालकांना मोबाईलपासून दूर ठेवण्याची काळजी घेतली पाहिजे. आपण पूर्वी दूरध्वनीचा वापर एका विशिष्ट ठिकाणी ठेवून करीत होतो. तसाच मोबाईलचा वापरसुद्धा वापर बऱ्याच अंशी एका ठिकाणी राहून केला पाहिजे. वाचन हे मोबाईलवर न करता मुद्रित माध्यमांद्वारा केले गेले पाहिजे.

**निष्कर्ष :**

१) बदलत्या माध्यमविश्वामुळे वाचनसंस्कृतीवर दूरगामी परिणाम झाल्याचे दिसून येते.

२) विविध प्रसारमाध्यमे व विविध समाज माध्यमे वाचन संस्कृतीच्या वाढीस पूरक नाहीत हे लक्षात येते.

३) वाचनसंस्कृती वृध्दिंगत करायची असेल तर इतर माध्यमांचा गरजेपेक्षा जास्त उपयोग करणे थांबवले पाहिजे हे निरीक्षणातून दिसून येते.

४) माध्यमांचा अतिरेकी वापर हे महत्त्वाचे कारण वाचन संस्कृतीच्या ऱ्हासासाठी कारणीभूत ठरू शकते असे दिसून येते.

**उपसंहार :**

वाचनसंस्कृतीमुळे मानवी पिढीच्या मनपटलावर योग्य परिणाम होऊन त्यांच्यात विचार प्रक्रिया सुरू असते. तंत्रज्ञानाने निर्माण केलेल्या विविध माध्यमांचा प्रभाव वाचन संस्कृतीवर पडल्यामुळे वाचनापासून नवी पिढी दूर जाताना दिसत आहे. वाचन ही नव्या बदलत्या पिढीसाठी निकामी बाब ठरत चालली आहे. वाचनापेक्षा इतर समाज माध्यमांवरील मनोरंजनात्मक व तात्काळ आनंद देणाऱ्या गोष्टींमध्ये त्यांना रस वाटू लागला आहे. आजची पिढी तंत्रज्ञानप्रिय व रंजकप्रिय पिढीच्या रूपात उदयास आली आहे. वाचन हे त्यांच्यासाठी कंटाळवाणी बाब ठरत आहे. वाचन संस्कृतीला अधिक गतिमान करायचे असेल तर येणाऱ्या पिढीच्या हाती भ्रमणध्वनीपेक्षा पुस्तक कसे दिसतील याचा विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे.

**संदर्भ टीपा**

१. ग. प्र. प्रधान, 'आगरकर लेखसंग्रह', साहित्य अकादेमी, न्यू दिल्ली, पुनर्मुद्रण २००७, पृ. ३५५

२. ग. प्र. प्रधान, 'आगरकर लेखसंग्रह', साहित्य अकादेमी, न्यू दिल्ली, पुनर्मुद्रण २००७, पृ. ३५६

३. यशवंत मनोहर, 'समाजपरिवर्तनाच्या दिशा', धम्मभूमी प्रकाशन, यवतमाळ, २००५, पृ. १४३

४. यशवंत मनोहर, 'मूल्यमंथन', कुणाल प्रकाशन, नागपूर, २००४, पृ. ७९

■■■


Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal
Journal No. 40776
ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL
AJANTA
Single Bliind Review /
Double Blind Review
Volume - XIII, Issue - I,
July - September - 2023
English / Marathi Part - I
Impact Factor / Indexing
2023 - 7.428
(www.sjifactor.com)
Ajanta Prakashan

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - XIII Issue - I July - September - 2023

ENGLISH / MARATHI PART - I

**Peer Reviewed Refereed and**
**UGC Listed Journal No. 40776**

**Single Blind Review / Double Blind Review**

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2023 - 7.428
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

VOLUME - XIII, ISSUE - I - JULY - SEPTEMBER - 2023
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 7.428 (www.sjifactor.com)

## CONTENTS OF MARATHI PART - I

| अनु. क्र. | लेख व लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २२ | शरच्चंद्र मुक्तिबोधांच्या मानुषता सिध्दांताचे मराठी समीक्षेतील योगदान<br>प्रमोद नारायणे<br>डॉ. शैलेंद्र लेंडे | १०६-११० |
| २३ | आदिवासी धर्म आणि वृक्ष<br>डॉ. आनंद के. भोयर | १११-११५ |

VOLUME - XIII, ISSUE - I - JULY - SEPTEMBER - 2023
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 7.428 (www.sjifactor.com)

# २२. शरच्चंद्र मुक्तिबोधांच्या मानुषता सिध्दांताचे मराठी समीक्षेतील योगदान

**प्रमोद नारायणे**
संशोधक विद्यार्थी, मराठी विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.
**डॉ. शैलेंद्र लेंडे**
मार्गदर्शक, प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख, स्नातकोत्तर मराठी विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.

**सारांश (The Abstract)**

शरच्चंद्र मुक्तिबोधांच्या एकूणच साहित्याने मराठी साहित्यक्षेत्रात नवमन्वतर घडवून आणले आहे. त्यांच्या साहित्यसमीक्षेने मराठी समीक्षेला नवी मानुष दृष्टी दिली. जीवनवादी समीक्षेचा अवलंब केल्याने मुक्तिबोधांची समीक्षा ही वैशिष्ट्यपूर्ण आणि मोलाची ठरली आहे. ज्या काळात कलावादाचे प्रस्थ होते, त्या काळात कलावादाला आव्हान देत समीक्षेची नवी रूपे मांडणाऱ्या मुक्तिबोधांचे समीक्षाक्षेत्रातील योगदान अतुलनीय ठरले आहे. त्यांच्या मानुषता सिद्धांताने मराठी समीक्षेला नवा आयाम प्राप्त करून दिला हे सर्वमान्य झाले आहे. मुक्तिबोधांच्या समीक्षाव्यवहाराने आणि त्यांच्या मानुषता सिद्धांताने साहित्याकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली असे दिसून येते. मुक्तिबोधांनी मार्क्सवादाची विचारमूल्ये स्वीकारून मानुषता या सिद्धांताच्या आधारे कलाकृतीच्या मूल्यमापनाची नवी दृष्टी वाचकांना आणि समीक्षकांना दिली हे त्यांचे मराठी समीक्षेतील योगदान महत्त्वपूर्णच म्हणावे लागेल. मुक्तिबोधांच्या साहित्य सिद्धांताला बुद्धिवादाची जोड लाभलेली असून त्यांचे समीक्षालेखन व साहित्यसिद्धांतन हे त्यांच्या प्रगाढ अशा साहित्यचिंतनावर आधारलेले आहे. त्यामुळे त्यांच्या साहित्यविचारांना वेगळ्या प्रकारची उंची प्राप्त झाली आहे. मुक्तिबोधांचे साहित्य आणि त्यांची समीक्षा ही मानवतावादी कुळाचे प्रतिनिधित्व करणारी अशी समीक्षा आहे. मुक्तिबोधांच्या एकूणच समीक्षेने आणि त्यांच्या मानुषता सिद्धांताने जीवनवादी समीक्षा प्रवाहात मोलाची भर घातली आहे. मुक्तिबोधांची समीक्षा मुख्यत्वेकरून समष्टीचा विचार करणारी आहे. मुक्तिबोधांच्या समीक्षा व्यवहाराने समाजाभिमुखता जोपासली असून सामाजिक मूल्यव्यूहाची समीक्षा म्हणून तिचे मोल जास्त आहे.

**संकेतशब्द (Keywords)**

१. समीक्षाक्षेत्रातील नवी व वैशिष्ट्यपूर्ण सैद्धांतिक मांडणी
२. कलावादी समीक्षेला आव्हान देणारी जीवनवादी समीक्षा
३. मराठी समीक्षाक्षेत्रात नवा आयाम प्राप्त करून देणारी सैद्धांतिक समीक्षा
४. मानुषमूल्य केंद्रस्थानी असलेली समीक्षा
५. सर्वव्यापी आणि सार्वकाली असा सिद्धांत व्यूह

VOLUME - XIII, ISSUE - I - JULY - SEPTEMBER - 2023
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 7.428 (www.sjifactor.com)

**प्रस्तावना (Introduction)**

शरच्चंद्र मुक्तिबोध यांच्या 'सृष्टी, 'सौंदर्य' आणि साहित्यमूल्य' या बहुचर्चित ग्रंथात त्यांची सैद्धांतिक समीक्षा आली आहे. ही सैद्धांतिक समीक्षा मानुषता या नावाने प्रसिद्ध आहे. या सैद्धांतिक समीक्षेनी मराठी सौंदर्यशास्त्रातच नव्हे, तर एकूणच भारतीय सौंदर्यशास्त्राच्या मांडणीत नवी भर टाकली आहे. एक सौंदर्यमीमांसक म्हणून आणि साहित्यशास्त्रज्ञ म्हणून समीक्षाक्षेत्रातील त्यांचे स्थान या ग्रंथाने व त्यातील सैद्धांतिक चर्चेने पक्के केले आहे. प्रचलित असलेल्या रस व लय सिद्धांतांची त्यांनी सैद्धांतिक चिकित्सा केली. साहित्याचे प्राणभूत तत्त्व म्हणून हे दोन्ही सिद्धांत कसे अपुरे आहेत याविषयी जोरकसपणे व समर्थ युक्तिवादासह सलग आणि समप्रलक्षी मांडणी केली आणि या दोन्ही सिद्धांताला वेगळा पर्याय म्हणून मानुषता हा नवा सिद्धांत मांडला, त्यांच्या या नव्या मांडणीने साहित्यातील अनेक निकष बदलवून टाकले व जुन्या साहित्यसिद्धांताना हादरा दिला. शरच्चंद्र मुक्तिबोधांना मार्क्सवादी विचाराचे साहित्यिक म्हणून मराठी रसिकमानस ओळखत असले तरी, मानुषता सिद्धांताची नवी दृष्टी देणारे सौंदर्यशास्त्रज्ञ म्हणून त्यांना नवी ओळख प्राप्त झाली आहे. मराठी समीक्षेतील त्यांच्या महत्वाच्या योगदानामुळे मराठी साहित्याला नवी दिशा मिळाली आहे. त्यामुळे मानुषता या अतिशय मौलिक सिद्धांताचे मराठी समीक्षेतील योगदान विशेष उल्लेखनीय असे आहे.

**मानुषता सिद्धांताचे मराठी समीक्षेतील योगदान**

भारतीय साहित्यक्षेत्रात प्रचलित असलेल्या सौंदर्य सिद्धांताची चिकित्सा करण्याच्या दृष्टीने त्यांनी आपल्या समीक्षा व्यापारात चर्चा केली. ही चर्चा करताना त्यांनी काही मुद्द्यांकडे मराठी समीक्षेचे लक्ष वेधले. ''सौंदर्य म्हणजे काय? सौंदर्याकृतीच्या संघटनेचे तत्त्व कोणते? सौंदर्याकृतींच्या प्रतवारीचा निकष कोणता? जीवनमूल्ये आणि सौंदर्यमूल्ये यांच्यातील संबंधाचे स्वरूप काय? इत्यादी प्रश्न हे समीक्षेतील मूलभूत आणि अनिवार्य प्रश्न असतात. या प्रश्नांची वेगवेगळी उत्तरे आपापल्या मगदुरीप्रमाणे साहित्य मीमांसक देतात. या प्रश्नांच्या उत्तरांना स्वतंत्र, सुसंगत आणि नवे मांडणी रूपाला भले तर त्या मांडणीला सौंदर्यसिद्धांत संबोधले जाते. अनुकृती, रस, लयतत्त्व, पोत इत्यांदींना या समजुतीचा भाग म्हणून सौंदर्यसिद्धांत संबोधले गेले आहे. प्रा. शरच्चंद्र मुक्तिबोधांनी 'मानुषता' ही उपरोक्त प्रश्नांचे स्पष्टीकरण देणारी एक लक्षवेधी मांडणी केली म्हणून 'मानुषता' सिद्धांताला सौंदर्यसिद्धांत मानले गेलेले आहे''[४] मराठी साहित्यातील कलावादी समीक्षेने साहित्यकृतीच्या आशयाच्या बाबतीत उदासिनता दाखविली होती. आशयापेक्षा रूपाला महत्त्व दिले गेले. मूळ आशय दूर जाऊन रचनेला जास्त महत्त्व प्राप्त झाले. आशय हा मागे पडू लागला. साहित्यकृतीची श्रेष्ठकनिष्ठता ठरवत असताना रूपवादाला महत्त्व प्राप्त झाले. मुक्तिबोधांच्या समीक्षेने मात्र रचनेला नाकारले नाही, किंवा रूपालाही नाकारले नाही. पण मुक्तिबोधांनी आशय आणि अभिव्यक्तीची एकसंधता स्पष्ट केली. आशय व्यक्त होतानाच तो एक रूप घेऊन, विशिष्ट रचनेनी बद्ध होऊन किंवा विशिष्ट प्रकारचा आकार घेऊन साहित्यकृतीचा आशय प्रकट होत असतो. त्या एकसंधतेला वेगळे करता येत नाही. आशय आणि अभिव्यक्तीची अविभाज्यता त्यांनी प्रतिपादित केली. मुक्तिबोधांनी आशय आणि आकृतीमधील सेंद्रियत्व व एकजीनसीपणा अधोरेखित केला. या विचारांमुळे मुक्तिबोधांच्या समीक्षालेखनाला एक नवे रूप प्राप्त झाले आहे. मुक्तिबोधांचे जीवनवादी समीक्षेतील स्थान अधिक मजबूत झाले आहे.

VOLUME - XIII, ISSUE - I - JULY - SEPTEMBER - 2023
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 7.428 (www.sjifactor.com)**

'मानुषता' सिद्धांताद्वारे मुक्तिबोधांनी मराठी समीक्षेला एक वेगळा आणि नवीन दृष्टिकोन उपलब्ध करून दिला आहे. कलाकृतीच्या, वाङ्मयीन ललितकृतीच्या व्यवच्छेदक लक्षणापाशी नेऊन पोहचविणारी 'मानुषतेची संकल्पना' निश्चितपणे मराठी समीक्षा व्यवहारात एक वेगळी ओळख निर्माण करणारी ठरली आहे. त्यांनी नव्या साहित्यसिद्धांताची मांडणी करून प्रचलित अशा साहित्यसिद्धांताच्या चर्चेत भर टाकली आहें. याबाबतीतही त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे मानावे लागेल. मुक्तिबोधांची समीक्षेच्या बाबतीत स्वतंत्र व वेगळी मते आहेत. त्यांची चिकित्सक व प्रतिभाशाली वृत्ती थेट समकालीन सामाजिक व सांस्कृतिक व्यवहाराला भिडते. त्या व्यवहाराची चिकित्सा करते आणि आपल्या वैचारिक दृष्टीने समकालाचा वेध घेते. मुक्तिबोधांना समकालीन समीक्षेबद्दल जे असमाधान वाटले, जी अभावग्रस्तता त्यांना या संपूर्ण व्यवहारामध्ये जाणवली त्याला पूर्ण करण्यासाठी त्यांनी आपली संपूर्ण अभ्यासवृत्ती कामी लावली. त्यांना पटत नसलेल्या प्रत्येक समीक्षाव्यवहाराची त्यांनी चिकित्सा केली. आणि आपले सडेतोड असे विचार व्यक्त केले. त्यामुळेच मानुषतेसारखा नवा पर्याय त्यांना शोधता आला. मुक्तिबोधांच्या मर्मग्राही दृष्टीला अशा नवनव्या वाटा सापडत गेल्या आणि त्यातून त्यांचा मानुषता सिद्धांत साकार झाला. त्यांनी समीक्षेला मानुषतेची नवी सिद्धांतदृष्टी दिल्यामुळे त्यांचे मराठी साहित्यसमीक्षेतील योगदान महत्त्वपूर्ण ठरले आहे.

शरच्चंद्र मुक्तिबोधांचा 'मानुषता' सिद्धांत भारतीय आणि महाराष्ट्रीय साहित्यसमीक्षेच्या तत्कालिन पार्श्वभूमीवर आकारास येताना दिसतो. यात आकळणाऱ्या उणेपणातून 'मानुषता' सिद्धांताची मांडणी करण्याची त्यांना आवश्यकता भासली, ज्या काळात मुक्तिबोध समाजनिष्ठ आशयाची ललितनिर्मिती करीत होते, त्या काळात भारतीय आणि महाराष्ट्रीय पातळीवर रस आणि लय ह्या दोन्ही सिद्धांतांच्या विचारव्यूहातून संबंध साहित्यरूपाचा विचार केला जात होता. आणि तो अभेद्य स्वरूपाचा होता. शरच्चंद्र मुक्तिबोध यांनी ह्या दोन्ही साहित्यसिद्धांताना नकार दिला आणि पर्यायी असा मानुषता सिद्धांत मांडला.

मराठी साहित्यात सौंदर्यवादाचा विचार प्रस्थापित पद्धतीने केला जात होता. काही विशिष्ट सिद्धांत रूढ व्हायला लागले होते. मुक्तिबोधांच्या साहित्यदृष्टीला ते फारसे पटणारे नव्हते. मुक्तिबोधांना ते अतिरेकी वाटले, आपल्या समीक्षालेखनाच्या निर्मितीचे कारण लिहिताना मुक्तिबोधांनीच म्हटले आहे की ''अतिरेकी सौंदर्यवादाचा पगडा जो मराठी ललितनिर्मितीची दिशाभूल करीत होता. त्या संदर्भात जीवनाचे व ललितकृतीचे नेमके नाते कोणते व वाङ्मयात ललितकृतीचे स्वरूप कोणते ह्याचा मी शोध घेत आलो आहे''[१] मुक्तिबोधांना सौंदर्यतत्त्वाचा आणि त्यातील प्राणभूत मानल्या गेलेल्या तत्त्वाधाराचा शोध घ्यायचा होता. प्रचलित नियमांपेक्षा त्यांना वेगळे काही सांगायचे होते, त्या जिज्ञासेतूनच त्यांच्या मानुषता सिद्धांताला गती मिळाली.

शरच्चंद्र मुक्तिबोध यांनी साहित्याच्या संदर्भात व त्यातील सौंदर्यमूल्याच्या संदर्भात 'मानुषता' सिद्धांताची केलेली मांडणी एक लक्षणीय स्वरूपाची मांडणी मानावी लागते. ललितकृतीचे व्यवच्छेदक संघटकतत्त्व म्हणून त्यांनी मानुषतातत्त्वाला अधिमान्यता दिली. मुक्तिबोधांनी 'मानुषता' तत्त्वाचे केलेले सिद्धांतन आधुनिक मराठी समीक्षाविचारामध्ये नाविन्यपूर्ण ठरले. मुक्तिबोधांची एकूणच समीक्षा आणि मानुषता सिद्धांत काळाला आव्हान देणारे नवे सिद्धांतन ठरले आहे त्यामुळे या सिद्धांतनाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. असे दिसून येते.

मराठी साहित्यात समाजशास्त्रीय, मानसशास्त्रीय आणि ऐतिहासिक दृष्टीने समीक्षा करणारे व या विचारांचा अवलंब करणारे समीक्षा वाङ्मय होतेच. पण मानुषतेच्या दृष्टीने विचार करीत एका व्यापक प्रक्रियेचा भाग बनत आणि मानुष मूल्यांना

VOLUME - XIII, ISSUE - I - JULY - SEPTEMBER - 2023
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 7.428 (www.sjifactor.com)

केंद्रस्थानी मानून त्यांनी समीक्षेची मांडणी केली. त्यामुळे त्यांचे मराठी समीक्षा क्षेत्रातील योगदान मोठे आहे. या सिद्धांताने भारतीय साहित्याशास्त्रात रूजलेल्या जुन्या व प्रचलित सिद्धांतांना नाकारून नव्या साहित्य विषयक सिद्धांताची उभारणी केली. जीवनवादी समीक्षेला अधिक बळकटी देण्याचे काम त्यांच्या समीक्षा व्यवहारांनी केले. हा सिद्धांत जीवनवादी समीक्षा सिद्धांताचे प्रतिनिधित्व करीत असल्याने जीवनाच्या सर्वच अंगाने सर्वस्पर्शी असा सिद्धांत ठरला आहे.

मुक्तिबोधांच्या मतानुसार, मानवी व्यवहारविश्व हे समाजनिष्ठ मूल्यात्मक कृतीचे विश्व असते. मनुष्य हा प्राणिसृष्टीचा एक घटक असला तरी तो सामाजिक प्राणी असल्याने समाजसृष्टी निर्माण करतो. मनुष्याजवळ भाषा, विचार, समाज असे स्वसंबंद्ध व समाजसंबंद्ध घटक असतात. मनुष्याच्या सभोवतालचे पर्यावरण हे मुळात सामाजिक पर्यावरण असते. ह्या सामाजिक पर्यावरणात मनुष्याच्या वैयक्तिक, सामूहिक, मानसिक, भावनिक, बौद्धिक इत्यादी कृती घडत असतात. मनुष्याच्या सर्वच प्रकारच्या क्रिया प्रतिक्रिया बाह्य रूपाने आणि आंतरिक रूपाने सामाजिक असतात. मानवी व्यक्ती ही समाजाच्या मूल्यव्यवस्थेशी विभिन्न प्रकारचे संबंध प्रस्थापित करीत असते व त्यामधून तिला वैशिष्ट्यपूर्णता प्राप्त होत असते. मानवी व्यक्तीच्या अवतीभवती असणारी व मनुष्यजातीला संस्कारित करणारी मूल्ये समाजसापेक्ष व गतिशील स्वरूपाची असतात. ह्या बदलत जाणाऱ्या व सतत गतिशील असणाऱ्या समाजसापेक्ष मूल्यांच्या मुळाशी 'मानुषता' नावाचे तत्त्व असते. असे मुक्तिबोध मांडणी करतात. ''जी व्यक्ती ज्या ठिकाणी असते. तिथल्या परिस्थितीच्या, संस्काराच्या, आवश्यकतेच्या आणि प्रभावाच्या अनुसार, त्यांच्या मनाचा काही भाग व्यक्त होतो. बाकीचा अव्यक्तच राहतो. दुसरीकडे जिथे कुठे त्या अव्यक्त मनाशी संबंधित भाग व्यक्त होईल तिथे मानवी मन धाव घेते. म्हणूनच आपल्याला कुठल्याही प्रान्तातली साहित्यकृती, चित्रकृती, संगीत, व नृत्यशैली आवडू शकते. आपल्या भाषेत झालेले, इतर भाषांतील चांगल्या कृतीचे अनुभव आपल्याला भावतात. समष्टीमध्ये मनुष्याचे अस्तित्व विलीन झालेले कधीच नसते. तरीही मी अनंत अस्तित्वाची बनलेली असते. पाकळी म्हणजे पूर्ण फूल नाही. पण पूर्ण फुलात पाकळी असतेच... व्यक्तीचे मन समष्टीचाच काही भाग व्यक्त करते. म्हणून व्यक्तीच्या व्यक्त झालेल्या अनुभवात समष्टीचा प्रत्यय येतो. याचे समष्टीशी नाते जुळते आणि अनुभव पूर्णांशाने येतो. तसेच एखाद्या कलाकृतीचे आकलन होण्यासाठी त्या कलाकृतीचा संपूर्ण अनुभव यायला हवा, तशी तिची निर्मिती व्हायला हवी.''[3] एकंदर जीवनव्यवहारामध्ये व त्याच्या अंगोपांगामध्ये मुक्तिबोध मानुषतेचे तत्त्व केंद्रवर्ती मानतात. या सिद्धांताची मांडणी मूळात जीवनाकडे एक तत्त्व म्हणून पाहण्याच्या मुक्तिबोधांच्या दृष्टी प्रवाहातून आणि समष्टीनिष्ठ विचारातून झाली आहे असे म्हणता येईल.

मानुषता हे मूल्य सर्वव्यापी, सर्वस्पर्शी व सर्वकालीन असे साहित्यमूल्य आहे या मूल्याच्या आधारे कोणत्याही साहित्याची समीक्षा करून वाङ्मयाची श्रेष्ठकनिष्ठता ठरवता येऊ शकेल. मराठी साहित्यातील संशोधनाला नवा आयाम मिळावा, नवी समीक्षादृष्टी प्राप्त व्हावी यासाठी मानुषता सिद्धांताच्या अभ्यासाची आवश्यकता आहे. मानुषता सिद्धांतामुळे मराठी समीक्षाक्षेत्रातील कक्षा रूंदावल्या आहेत.''मार्क्सवादी जीवनदृष्टीची कविता आणि कादंबरी लिहून त्यांनी ललित लेखनाचा उदात्त वस्तुपाठ मराठी वाचकांसमोर ठेवला. इतकेच नव्हे तर एकूनच साहित्यतत्त्वाचा विचार एका नव्या परिप्रेक्ष्यामध्ये करता येतो, याची आपल्या समीक्षालेखनामधून त्यांनी मूलभूत स्वरूपाची मांडणी केली. 'मानुषता' नावाचे तत्त्व साहित्यविचारांमध्ये व

VOLUME - XIII, ISSUE - I - JULY - SEPTEMBER - 2023
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 7.428 (www.sjifactor.com)

साहित्यसमीक्षेमध्ये कसे मध्यवर्ती ठरू शकते, याचे नवे असे विवेचन त्यांनी केले. मुक्तिबोधांचे हे 'मानुषता' तत्त्वाचे सिद्धांतन आधुनिक मराठी समीक्षा सिद्धांतांमध्ये लक्षणीय स्वरूपाचे मानावे लागते.''[४] मुक्तिबोधांचे मराठी साहित्यात असलेले श्रेष्ठ स्थान व त्यांनी मांडलेला मानुषता सिद्धांत यांचे महत्त्व लक्षात घेऊन त्यांनी मांडलेले 'मानुषता' हे तत्त्व साहित्यविचारांमध्ये व समीक्षेमध्ये कसे मध्यवर्ती ठरू शकेल यांचा शोध घेण्याची आवश्यकता आहे. या दृष्टीने पुढील काळात विचार व्हावा ही अपेक्षा मी याप्रसंगी व्यक्त करतो आणि माझे निबंध वाचन इथे थांबवतो.

**निष्कर्ष**

१. शरच्चंद्र मुक्तिबोधांच्या मानुषता सिद्धांताने मराठी साहित्यातील साहित्य समीक्षा व सिद्धांत समृद्ध केले.

१. शरच्चंद्र मुक्तिबोधांच्या मानुषता सिद्धांताने जीवनवादी साहित्य समीक्षेत नव्याने भर घातली.

२. मुक्तिबोधांच्या साहित्यसिद्धांताने ललितकृतीच्या मूल्यमापनाची नवी समीक्षा पद्धती रूढ केली.

३. मुक्तिबोधांच्या मानुषता सिद्धांताने मराठी समीक्षा व्यवहारातील रूढ व पारंपरिक पद्धतींना नाकारून नव्या समीक्षा पद्धतीची रूजवात केली.

४. मुक्तिबोधांच्या मानुषता सिद्धांताने साहित्याची श्रेष्ठ कनिष्ठता ठरविता येते हे सिद्ध केले.

**उपसंहार**

शरच्चंद्र मुक्तिबोध यांचा मानुषता सिद्धांत मराठी साहित्य क्षेत्रातच नव्हे, तर एकूणच साहित्य व्यवहारात मूलगामी असा ठरला आहे. भारतीय साहित्याच्या दृष्टिकोनातून समाजव्यवहार व जीवनव्यवहार यांचा एकसंध सांधा जोडण्याचे काम या समीक्षेने केले आहे. त्यामुळे या साहित्य सिद्धांताला अनन्यसाधारण महत्त्व आहे. मराठी साहित्य समीक्षेत मानुषता सिद्धांताची जेवढी दखल घ्यायला हवी होती तेवढी घेतली गेली नाही. आधुनिक मराठी समीक्षकांनी यानुसार होणाऱ्या मूल्यमापनाकडे फारसे लक्ष दिले नाही. पण मानुषतेचा मूळ आशय हा सर्वव्यापी, सर्वकाली अशा तत्त्वावर आधारित असल्याने या सिद्धांताला नव्या दिशा लाभल्याशिवाय राहणार नाही, असा आशावाद ठेवायला हरकत नाही.

**संदर्भटीपा**

१. डॉ. यशवंत मनोहर, नवे साहित्यशास्त्र, विजय प्रकाशन, नागपूर, २००९, पृ. १५५

२. शरच्चंद्र मुक्तिबोध, 'सृष्टी सौंदर्य आणि साहित्यमूल्य, लोकवाङ्मय गृह, मुंबई, दु. आ. १९९७, पृ. ११

३. भारती सुदामे, 'नव्या मळवाटेचा यात्रिक : शरच्चंद्र मुक्तिबोध' विजय प्रकाशन, नागपूर, १९९२ पृ. ९१

४. डॉ. शैलेंद्र लेंडे, 'मुक्तिबोधांचा मानुषता सिद्धांत आणि मराठी कविता, डॉ. राजेंद्र नाईकवाडे आणि इतर ( संपा. ) 'अर्वाचीन मराठी काव्यमीमांसा' पद्मगंधा प्रकाशन, पुणे २०१४ पृ. ७१६


UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990
संशोधक
वर्ष : ९१ • डिसेंबर २०२३ • अंक ३
G20
भारत 2023 INDIA
प्रकाशक : इतिहासाचार्य वि.का.राजवाडे संशोधन मंडळ,धुळे

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ , धुळे
या संस्थेचे त्रैमासिक

## || संशोधक ||

डिसेंबर (पुरवणी) – २०२३ (त्रैमासिक)

● शके १९४५ ● वर्ष : ९१ ● अंक : ४

**✱ सहसंपादक ✱**

- प्राचार्य डॉ. अनिल माणिक बैसाणे
- प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे
- प्रा. डॉ. मृदुला सुमनसौरभ वर्मा
- प्रा. श्रीपाद माधव नांदेडकर

**✱ प्रकाशक ✱**

श्री. संजय मुंदडा
कार्याध्यक्ष
इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८
Email ID : rajwademandaldhule1@gmail.com
rajwademandaldhule2@gmail.com

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००

सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

मूल्य रु. १००/-

वार्षिक वर्गणी रु. ५००/-, आजीव वर्गणी रु. ५०००/- (१४ वर्षे)

विशेष सूचना : संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने 'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

मुखपृष्ठ चित्र : G 2 भारत २०२३

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे.
या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

अनुक्रमणिका

१. संपादकीय एक
२. आवाहन दोन
३. छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रगत दुर्गशास्त्र १
- डॉ. मधुकर विठोबा जाधव, हलकर्णी, ता.चंदगड, कोल्हापूर
४. भारतीय संघराज्यातील केंद्र-राज्य संघर्ष : एक अवलोकन ८
- डॉ. बाबासाहेब त्रिंबक मोताळे, म्हसदी, धुळे.
५. खानदेशातील शतकमहोत्सवी ग्रंथालये: एक विश्लेषणात्मक अभ्यास १८
- श्री. ज्ञानेश्वर रघुनाथ तायडे, जळगाव.
- डॉ. हेमकांत मगन चौधरी, जळगाव.
६. गगनबावडा परिसर आणि भुईबावडा-करूळ घाट, कोल्हापूर याचे आर्थिक महत्त्व : प्राचीन कालखंड २४
- डॉ. योगेश प्रभुदेसाई, कोल्हापूर
- श्री. सारंग घारपुरे, सांगली.
७. बस्तर मधील आदिवासींचा भूमकाल उठाव : इ.स. १९१० एक ऐतिहासिक अध्ययन ३१
- डॉ. नरेश एम. मडावी, गडचिरोली.
८. अशासकीय संस्थांचे कार्य व सामाजिक परिवर्तन : एक संशोधकीय विश्लेषण ३८
- डॉ. देवानंद शिंदे, पुणे.
९. काळ्या निळ्या रेषा – आत्मकथेचा आस्वादक समिक्षात्मक अनुबंध ४४
- डॉ. गणेश सुधाकर चौधरी

१०. **संसदपटू मधू लिमये आणि स्वातंत्र्य चळवळीचा आढावा** ४९
– प्रा. राजू पां. लिपटे, नागपूर.

११. **सावित्रीबाई फुलेंच्या कवितेतील सामाजिक भान** ५४
– प्रा. प्रमोद नारायणे, वर्धा.

१२. **Ragi : A Nutritional Powerhouse for Agriculture in Sindhudurg (MS)** ६२
- Prof. Dr. Anant Nana Lokhande, Sindhudurg.

१३. **A Comparative Study of Social Motivation and Leadership Skills Effectiveness** ७०
- Khushboo Rathore, Bilaspur, Chhattisgarh.
- Dr. Swati Jajoo, Bilaspur, Chhattisgarh.

१४. **Medemneo, Festival of Yimkhiung Nagas** ८०
- Dr. Kinitoli H. Yeptho, Nagaland

१५. **Ayurveda : The foundation of Ancient Medical Science** ८५
- Dr. Siddhart R. Dawane, Phagwara (Punjab)

१६. **Will India Succeed Lessening Rivalry Against China : Political Perspectives and Different Dimensions** ९५
- Dr. Sandip Tundurwar, Nagpur
- Raju P. Lipte, Napur.

# सावित्रीबाई फुलेंच्या कवितेतील सामाजिक भान

- प्रा. प्रमोद नारायणे, वर्धा

## १. प्रस्तावना :

सावित्रीबाई फुले या आधुनिक सामाजिक चळवळीतील स्त्री शिक्षणाच्या कट्टर पुरस्कर्त्या, स्त्रियांच्या उद्धारक आणि पुरुषांप्रमाणे समाजव्यवस्थेतील सर्व प्रक्रियेत भाग घेण्याचा अधिकार स्त्रियांनाही आहे, यासाठी सतत झटणाऱ्या झुंझार समाजसेविका म्हणून सर्वपरिचित आहेत. स्त्रीउद्धाराच्या महान कार्यासाठी आपले आयुष्य वेचणाऱ्या एकोणिसाव्या शतकातील एक तेजस्वी स्त्रीरत्न. महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीचे जनक, दलित-बहुजनांचे तारणहार व सत्यशोधक समाजाचे संस्थापक महात्मा फुलेंच्या त्या सहचारिणी होत. स्वतःच्या अखंड कार्यकर्तृत्वाने त्या आद्यशिक्षिका, मुख्याध्यापिका, विधवांच्या, अनाथांच्या पालनकर्त्या, दीनदलितांच्या उद्धारक, इतकेच नव्हे तर आधुनिक मराठी कवितेच्या त्या गंगोत्री बनल्या. जोतिबा फुलेंच्या खांद्याला खांदा लावून केलेले त्यांचे कार्य युगकार्यच आहेत. स्त्री सुद्धा पुरुषांच्या बरोबरीने युगप्रवर्तक कार्य करू शकते, हे सावित्रीबाईंनी जगाला सिद्ध करून दाखविले. "एका अशिक्षित स्त्रीने शिक्षण घेऊन शिक्षिका बनावे आणि वर्षानुवर्षे अज्ञानाच्या अंधकारात चाचपडणाऱ्या स्त्री-शूद्रांना ज्ञानाचा प्रकाश दाखवावा, ही गोष्ट भारताच्या दोन हजार वर्षांच्या इतिहासात अपूर्व अशी आहे."[१] सावित्रीबाई फुलेंची त्यागवृत्ती जगात अद्वितीय स्वरूपाची आहे. आपले आयुष्य पणाला लावून त्यांनी समाज परिवर्तनाचा ध्यास घेतला होता. त्यांच्या कार्यकर्तृत्वाला तोड नाही.

सामाजिक कार्यकर्त्या म्हणून चळवळ व साहित्य यांचा मेळ त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येतो, त्यांनी मोजके लेखन केलेले आहे, तरी हेही लक्षणीय व वैशिष्ट्यपूर्ण असे आहे.

## २. सावित्रीबाईंची साहित्यसंपदा :

समाजप्रबोधनाचे एक साधन म्हणून त्यांनी वाङ्मयाची निर्मिती केली आहे. त्याचे दोन कवितासंग्रह उपलब्ध झाले असून त्यात 'काव्यफुले' व 'बावनकशी सुबोध

रत्नाकर' या दोन संग्रहांचा समावेश आहे. सावित्रीबाईंनी जोतिबांना लिहिलेली तीन पत्रे उपलब्ध आहेत. पहिली दोन पत्रे मोडी लिपित असून तिसरे पत्र देवनागरी लिपीत आहे. याबरोबर मातुश्री सावित्रीबाईंची भाषणे व गाणी, सावित्रीबाईंनी छापून प्रसिद्ध केलेली जोतिबांची भाषणे व इतर स्फुटलेखन सावित्रीबाईंच्या नावावर उपलब्ध आहे. संख्येच्या दृष्टीने अल्प असलेले त्यांचे वाङ्मय वैचारिक दृष्टीने मात्र मौलिक आहे.

**३. सावित्रीबाई फुलेंची कविता :**

सावित्रीबाई फुलेंचा पहिला कवितासंग्रह 'काव्यफुले' हा होय. १८५४ साली हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला. या संग्रहातील १२ कवितांचे 'सावित्रीबाईंनी मोडी लिपीत केलेले कच्चे टाचण उपलब्ध झाले आहे. त्यामुळे या कवितासंग्रहातील कविता म्हणजे सावित्रीबाईंची स्वररचना होय हे सिद्ध होते.''[२] या संग्रहात एकूण ४१ कवितांचा समावेश आहे. यात काही दीर्घ स्वरूपाच्या तर काही स्फुट रचना आहेत.

सावित्रीबाईंचा दुसरा काव्यसंग्रह 'बावन्नकशी सुबोध रत्नाकर' यात सहा रचनांचा समावेश असून 'उपोद्घात सिद्धता, पेशवाई, आंग्लाई, जोतिबा आणि उपसंहार अशी शीर्षके दिली आहेत.' अथ बावन्नकशी सुबोध रत्नाकर असे या पुस्तकाला नाव असून महात्मा फुलेंचे हे पहिले काव्यमय चरित्र होय. यामध्ये बावन्न कडवी असल्याने 'बावन्नकशी....' असे नाव दिले आहे. या संग्रहाबरोबरच त्यांच्या काही स्फुट स्वरूपाच्या रचनाही उपलब्ध आहेत.

**४. सावित्रीबाई फुलेंच्या कवितेचे आशयविशेष :**

उपलब्ध दोन्ही कवितासंग्रहांमधील कवितांचा अभ्यास केल्यास त्यांच्या कवितेचे काही आशयविशेष आपल्या दृष्टीस पडतात. ही आशय वैशिष्ट्ये खालील प्रमाणे सांगता येतील.

१) सामाजिक जाणिवेच्या कविता
२) निसर्गविषयक आशय असलेल्या कविता
३) काव्यविषयक विचार व्यक्त करणाऱ्या कविता
४) व्यक्तिविषयक कविता
५) प्रार्थनापर कविता
६) आत्मपर जाणीव निर्माण करणाऱ्या कविता
७) उपदेशपर कविता

८) इतिहास विषयक मांडणी करणाऱ्या कविता
९) शिक्षणविषयक कविता
१०) शेतीविषयक कविता

स्थूल मानाने अशी वैशिष्ट्ये आपल्याला दिसतात. या वैशिष्ट्यांमधून सावित्रीबाईंची कविता. किती मूल्यगर्भ होती. यांची ओळख आपल्याला होते. समग्रलक्षी असे रूप या कवितेला प्राप्त होते.

**५. सावित्रीबाई फुलेंच्या कवितेतील सामाजिक भान :**

सावित्रीबाईंच्या कवितेसंदर्भात विचार करीत असताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे, आधुनिक मराठी कवितेचे जनक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या केशवसुतांच्या ३० वर्षे त्यांचा पहिला काव्यसंग्रह 'काव्यफुले' प्रकाशित झाला. ''त्यांच्या काव्यरचनेचा काळ केशवसुतांच्या पेक्षा तीस वर्षांनी आधी आहे. म्हणूनच केवळ त्यांची कविता महत्त्वाची आहे असे नाही, तर केशवसुतांनी जे विषय आपल्या काव्यासाठी वापरले, ज्या प्रकारची आत्मपर कविता लिहिली, निसर्गपर कविता लिहिली, सामाजिक जाण दाखविली, काव्यविषयक विचार मांडले आणि स्वातंत्र्याची प्रीती व्यक्त केली, त्याच धर्तीवर सावित्रीबाईंच्याही काही कविता आहेत. त्यांची संख्या कमी असेल, परंतु ज्या काळात त्यांनी ही काव्यरचना केली, त्याकडे पाहिले असता या कवितांचे महत्त्व अधिकच नजरेस भरते.''[३] कृ.पं. देशपांडे म्हणतात. त्याप्रमाणे आधुनिक कवितेच्या प्रारंभाची कविता म्हणून सावित्रीबाईंच्या कवितेचे मोल जास्त आहे.

सामाजिक चळवळीत सावित्रीबाई प्रत्यक्षात सहभागी होत्या. त्यांनी समाज परिवर्तनाच्या प्रत्येक आंदोलनात प्रकर्षाने सहभाग घेतला होता. त्यामुळे त्यांच्या कवितांमधून हे सामाजिक भान उत्कटपणे निदर्शनास येते. पारंपारिक समाजव्यवस्थेला विरोध करीत नवसमाजनिर्मिती करणे हा सावित्रीबाईंच्या विचाराचा मूळ गाभा आहे. कवितेमधूनही हे विचारसूत्र दिसते. त्यामुळे त्याच्या कवितांमध्ये समाजात आमूलाग्र बदल घडून आणण्याच्या दृष्टीने काव्यरूपात विचारसूत्रे पेरली आहेत.

'काव्यफुले' हा कवितासंग्रहातील एकूण ४१ कवितांपैकी सामाजिक आशय असलेल्या १४ कविता आढळतात. त्या अशा १. संसाराची वाट, २. मानव आणि सृष्टी, ३. शूद्रांचे दुखणे, ४. मनू म्हणे, ५. ब्रम्हवंती शेती, ६. नवस, ७. शूद्र शब्दाचा अर्थ, ८. बळीचे स्त्रोत, ९. शिकणेसाठी जागे व्हा, १०. शूद्रांचे परावलंबन,

११. तयास मानव म्हणावे का? १२. इंग्रजी माऊली, १३. अज्ञान, १४. सावित्री व जोतिबा संवाद या शीर्षकांच्या कवितांचा उल्लेख सामाजिक भान असलेल्या कविता म्हणून करता येईल.

सावित्रीबाईंचा मूळ पिंडच सामाजिक कार्याचा आहे. स्त्री शूद्रातिशूद्राच्या समस्या हा त्यांच्या एकूणच कार्याचा केंद्रबिंदू आहे. संपूर्ण आयुष्य त्यांनी यासाठीच वाहिलेले आहे. ''सावित्रीबाई जोतीरावांच्या बरोबरीने समाजकार्य करीत होत्या, स्त्रीशूद्रांना शिक्षण देण्याचे व्रत त्यांनी अंगीकारले होते. त्यामुळे साहजिकच, तळागाळातल्या समाजाचे त्यांना जवळून दर्शन घडले होते. शूद्रांची दुःखे कोणती आहेत ती त्यांना समजली होती. दलितांवर अन्याय कसा होतो आहे, हे त्यांनी पाहिले होते. यातून या समाजाला बाहेर काढायचे असेल, त्यांचा विकास साधायचा असेल तर शिक्षणाशिवाय दुसरा उपाय नाही हे त्यांना पटले होते. तसेच दलित समाजातील लोकांची अंधश्रद्धा, नवससायासांच्या पद्धती याही त्यांनी पाहिल्या होत्या. त्यामुळे ही सामाजिक जाण जर त्यांच्या काव्याचा विषय बनली असली तर नवल नाही. किंबहुना दीनदलितांचे ते आर्तक्रंदन सावित्रीबाईंच्या कवी हृदयाला भिडले आणि तेच शब्दरूप पावले.''[४] असे म्हणावे लागेल. सामाजिक दृष्टीने समाजव्यवस्थेत निर्माण झालेल्या अनेक प्रश्नांना त्यांनी स्पर्श केला आणि त्यांना शब्दरूप देऊन त्या कवितांद्वारे प्रकट करण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

### ५.१ शूद्रातिशूद्रांच्या दयनीय अवस्थेचे चित्रण :

सामाजिक विषमतेने येथील शूद्रातिशूद्रांचे संपूर्ण जीवन पोळले गेले आहे, याची जाणीव सावित्रीबाईंना आहे. हे विषमतेचे विष हजारो वर्षांचे असून शूद्राच्या मागे हे व्यवस्थेनी निर्माण केले आहे. शूद्राच्या अत्यंत दयनीय अवस्थेचे चित्रण सावित्रीबाईंनी 'शूद्राचे दुखणे', 'मनू म्हणे', 'ब्रम्हवंती शेती', 'इंग्रजी माऊली', 'शूद्र शब्दाचा अर्थ', 'शूद्रांचे परावलंबन' इत्यादी कवितांमधून केले आहे.

''अवस्था पाहुनि त्यांची । होय शब्दी मन उठे
सुलभ मार्ग कोणता काय । विचारे बुद्धि अटे''[५] (शूद्राचे दुखणे)

मनूने लिहिलेल्या ग्रंथामुळे किती हालअपेष्टांना शूद्रांना सामोरे जावे लागते याची कल्पना सावित्रीबाईंना आहे. विषमतावादी व्यवस्था निर्माण करण्यात मनूचा मोठा हात आहे हेही त्यांना माहिती आहे म्हणून त्या म्हणतात,

"विषम रचती । समाजाची रीती ।
धूर्तांची ही नीती । अमानवी ।"[६] (मनू म्हणे)

शूद्र शब्दाचा मूळ अर्थ काय? याची मिमांसा ते 'शूद्र शब्दाचा अर्थ' या कवितेत करून देतात. शूद्र हे इथले नेटिव्ह असून, ते पराक्रमी होते, त्यांचेच आपण वंशज आहोत, पण परिस्थितीनुरूप झालेल्या बदलाने बाहेरचा झाला अशी अवस्था निर्माण झाली. शूद्र हेच इंडियाचे धनी आहेत. त्यामुळे "नाव असे त्यांचे इंडियन"[७] असे शूद्रच मूलनिवासी असल्याचे प्रतिपादन ते कवितेतून करतात. शूद्राच्या दारिद्र्याचे वर्णन करताना कवयित्री म्हणतात.

"शूद्र आणि अतिशूद्र । अज्ञानाने पछाडले
देवधर्म रूढी अर्चीं । दारिद्र्याने गळाले"[८]

त्यांच्या जीवनात सुख नाही तर दुःखांनाच सुख मानावे लागते म्हणून त्यामुळे त्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली असेही सावित्रीबाईंनी कवितेतून सांगितले.

**५.२ समाज सुधारणेसाठी ज्ञानमार्ग :**

'विद्येविना मती गेली....' हा सिद्धांत जोतिराव फुलेंनी आपल्या काव्याद्वारे सांगितला सामाजिक विषमता नष्ट करायची असेल आणि समताधिष्ठित समाजनिर्मिती करायची असेल, तर ज्ञानासारखा दुसरा मार्ग नाही, याची जाण सावित्रीबाईंना आहे, म्हणून त्या शूद्रातिशूद्र हे अज्ञानानी पछाडले आहेत असे म्हणतात.

"ज्ञानाचे नसती डोळे । म्हणोनि न दिसे दुःख
स्वावलंबी नसे शूद्र । स्विकारती पशू सुख"[९]

अज्ञानामुळे येथील भट, ब्राह्मण शूद्रांचा फायदा घेऊन त्यांना गुलाम बनवित आहेत.

"ज्ञान नाही विद्या नाही
ते घेणेचि गोडी नाही
बुद्धि असूनि चालत नाही
तयास मानव म्हणावे का?"[१०]

असा सवाल त्या करतात ज्ञानानेच विचार सुचतात, बुद्धी चालते. ज्ञान मिळविल्यास सामाजिक सुधारणा करणे सोपे आहे, असे सावित्रीबाईंना वाटते ते त्यांनी कवितेतून सांगितले आहे.

### ५.३. सामाजिक विषमता निर्माण करणाऱ्यांचा विरोध :

विषमता निर्माण करण्यात मनुस्मृती ग्रंथ कारणीभूत आहे. या कायद्याच्या ग्रंथाने समाजव्यवस्थेला विभागले असून समानता नष्ट केली, म्हणून सावित्रीबाई अशा मनूचा विरोध करते.

"शूद्र जन्म घेती । पूर्वींची पापे ती ।
जन्मी या फेडती । शूद्र सारे ।।"[११] (मनू म्हणे)

ही धर्माज्ञा ब्राह्मणांनी येथील शूद्रांना केली. पापे फेडण्यासाठीच शूद्र जन्माला आले. त्यामुळे त्यांनी असेच जीवन जगावे, हा मनूचा सिद्धांत सावित्रीबाईंना अन्यायकारक वाटतो.

### ५.४ समाजातील अंधश्रद्धांवर हल्ला :

अनेक धार्मिक ग्रंथांनी कर्मकांड, व्रतवैकल्ये यांच्या फासाला शूद्रांना अडकविले आणि त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेतला. आर्थिक दृष्टीने त्यांना भोंदाडून खाल्ले, सावित्रीबाई नवससायासावर हल्ला चढवितात.

"नवस करिती । बकरू मारीन
नवस फेडीन । बाळजन्मी ।।
धोंडे मुले देती । नवसा पावती
लग्न का करती । नारी नर ।।[१२] (नवस)

तुकाराम महाराजांनी सांगितलेल्या 'नवसे कन्या पुत्र होती, का करणे लागे पती' या उक्तीची येथे सावित्रीबाई आठवण करून देतात आणि या नवसाने, कर्मकांडाने काहीही भले होणार नाही हेही कवितेतून आवर्जून सांगतात.

### ५.५ समताधिष्ठित समाजनिर्मितीविषयी आशावादी :

जोतिराव फुलेंच्या क्रांतिकार्याने आणि समाजसुधारकांच्या प्रयत्नाने एक दिवस समाजात परिवर्तन घडून येईल, याविषयी सावित्रीबाई आशावादी आहेत. म्हणून त्या म्हणतात,

"चंद्र मावळला । उगवला सूर्य ।।
उजळे अपूर्व । पूर्व दिशा ।।"[१३] (सावित्री व जोतिबा संवाद)

हा अंधार हटणार आहे, शूद्र जागे होतील. या व्यवस्थेने कोंडलेला कोंबडा जागा होईल आणि पहाटेच्या आरवण्याने लोकांमध्ये जागृती करेल असे त्यांना वाटते, काळरात्र गेलेली आहे. अज्ञान पळाले आहे. अज्ञान पळाले आहे. सर्व जागे झाले आहेत, आता मानवतेचे केंद्रच गाठायचे आहे. असे समताधिष्ठित समाजनिर्मितीचे स्वप्ने त्यांना पडतात.

सर्वांनी इंग्रजी शिकले पाहिजे हे त्यांनी सांगितले, आपल्या कवितेतून त्यांनी धर्मचिकित्सा केली. माणुसकीचा मार्ग सांगितला, मानवता प्रस्थापित करणारी शिकवण दिली. समाजातील दु:खिताच्या दु:खांना वाचा फोडून त्याविरुद्ध उठाव केला. ''सावित्रीबाईंनी ही सारी समाजस्थिती अवलोकन करून त्याला काव्यरूप दिले, ही त्या काळाच्या दृष्टीने निश्चितच महत्त्वाची गोष्ट आहे, समाजातले दु:ख, वेदना या काव्यरूप घेऊ शकतात. त्या भावांनेही गीत होऊ शकते, हे त्यांनीच प्रथम दाखवून दिले असे म्हटले तर फारसे वावगे ठरू नये.'[१४] ही गोष्ट निश्चितच खरी आहे.

सारांश सावित्रीबाईंनी आपल्या कवितेतून एकूणच त्या काळातील सामाजिक परिस्थितीचे व विषमतामूलक समाजाचे चित्र उभे केले. त्याचे विदारक रूप दाखविले आणि अज्ञान नाहीसे झाल्याशिवाय समाजसुधारणा होणे शक्य नाही, हे ही आपल्या काव्यचिंतनातून स्पष्ट केले. आधुनिक मराठी कवितेची सुरूवात जरी केशवसुताच्या कवितेपासून झाली असे मानले, तरी त्याची पार्श्वभूमी तयार करण्यासाठी सावित्रीबाई फुलेंची कविता समर्थ होती, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

### ६. निष्कर्ष :

१. प्रत्यक्ष समाजातील कार्य आणि कवितेतून मांडलेल्या भावना यातून सावित्रीबाईंची कविता पोटतिडकीने आलेली सामाजिक भान असलेली कविता वाटते.

२. शूद्राच्या कल्याणासाठी व त्यांना ज्ञानमार्ग दाखविण्यासाठी लिहिलेली कविता असल्यामुळे कवितेची भाषा सुबोध व सोपी आहे.

३. आधुनिक कवितेची पार्श्वभूमी तयार करण्याचे कार्य तीस-चाळीस वर्षांपूर्वी सावित्रीबाईंच्या कवितेने केले.

४. कवितेमागील सावित्रीबाईंचा हेतू प्रबोधन असला तरी त्याच्या कवितेला काव्यविषयक जाण आहे.

५. सावित्रीबाईंना समाजपरिवर्तनाविषयी किती गंभीर भान होते, हे त्यांच्या कवितांवरून दिसते.

६. समाजातील दु:ख दैन्य सावित्रीबाई पाहतात आणि त्या अस्वस्थतेतून त्यांना काव्यरूप देतात.

### ७. उपसंहार :

सावित्रीबाई फुले यांच्या कवितेतून दिसून येणारे सामाजिक भान हे नव्या मूल्यांच्या प्रस्थापनेचे उद्गार व्यक्त करणारे आहेत. त्यांच्या कवितांनी समताधिष्ठित समाजनिर्मितीच्या

दृष्टिकोनातून आशय व्यक्त केला आहे. त्यांच्या कवितेतून मुख्यत्वेकरून सामाजिक जाणिवा प्रगल्भतेने दिसून येतात. त्यांच्या काव्यरचनेला जीवनदायी दृष्टिकोन आहे. त्यांची काव्यदृष्टी नव्या समाजघडणीच्या प्रस्थापनेचे गीत गाणारी आहे. सावित्रीबाई फुलेंनी परिवर्तवादी मूल्यांना आपल्या कवितेच्या केंद्रस्थानी ठेवलेले आहे. त्यामुळे त्यांच्या कवितांना सामाजिक भानाचे एक आशयमूल्य प्राप्त झाले आहे असे दिसून येते.

**८. संदर्भ टीपा :**


१. माळी मा. गो. (संपा), ***सावित्रीबाई फुले-समग्र वाङ्मय,*** महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ प्रकाशन, मुंबई च. आ. २००६, पृ. ०९.

२. तत्रैव, पृ. १७.

३. नरके हरी (संपा)., ***महात्मा फुले साहित्य आणि चळवळ,*** डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले आणि राजर्षी शाहू चरित्र-साधने प्रकाशन समिती, मुंबई, २००६, पृ. ४३२.

४. ***तत्रैव,*** पृ. ४३९.

५. माळी डॉ. मा. गो. (संपा.), ***सावित्रीबाई फुले-समग्र वाङ्मय,*** महाराष्ट्र राज्य, साहित्य आणि संस्कृती मंडळ, प्रकाशन, मुंबई च.आ. २००६ पृ.१७.

६. ***तत्रैव,*** पृ.१९.

७. ***तत्रैव,*** पृ.२२.

८. ***तत्रैव,*** पृ.२५.

९. ***तत्रैव,*** पृ.२५.

१०. ***तत्रैव,*** पृ.२७.

११. ***तत्रैव,*** पृ.२९.

१२. ***तत्रैव,*** पृ.२२.

१३. ***तत्रैव,*** पृ.३३.

१४. **उपरोक्त क्र. ३.**


⌘⌘⌘


UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990
संशोधक
वर्ष : ९१ • डिसेंबर २०२३ • पुरवणी विशेषांक १२
G20
भारत 2023 INDIA
प्रकाशक : इतिहासाचार्य वि.का.राजवाडे संशोधन मंडळ,धुळे

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे
या संस्थेचे त्रैमासिक

## ।। संशोधक ।।

पुरवणी अंक १२ – डिसेंबर २०२३ (त्रैमासिक)

• शके १९४५ • वर्ष : ९१ • पुरवणीअंक : १२

संपादक मंडळ

• प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे • प्राचार्य डॉ. अनिल माणिक बैसाणे
• प्रा.डॉ. मृदुला वर्मा • प्रा. श्रीपाद नांदेडकर

अतिथी संपादक

• प्रा. गणेश बेले • प्रा.डॉ. प्रमोद अलोने • प्रा.डॉ. किशोरचंद्र रेवतकर

❊ प्रकाशक ❊

श्री. संजय मुंदडा

कार्याध्यक्ष, इ.वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१.
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४२२२८९४७१, ९४०४५७७०२०
ई-मेल : rajwademandaldhule1@gmail.com
rajwademandaldhule2@gmail.com

कार्यालयीन वेळ

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवार सुट्टी)

अंक मूल्य ₹ १००/-

वार्षिक वर्गणी (फक्त अंक) रु. ५००/-; सदस्यता वर्गणी : रु. २५००/-

विशेष सूचना : संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्ट ने 'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

अक्षरजुळणी : अनिल साठये, बावधन, पुणे 21.

टीप : या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका

१ प्रधानमंत्री उज्ज्वला योजना किती प्रभावी ठरली? यावर टिकात्मक विश्लेषण
- डॉ.अमरदिप दामोधर रामटेके, नागपूर ---------- ५
२ महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयांचा विकास : एक विश्लेषणात्मक अभ्यास
- प्रा.अनंत थोरात, रोहा, जि.रायगड ---------- १०
३ युद्ध काळातील मनोरोगी सैनिकांवर युद्धाचा प्रभाव
- डॉ.बंडू मानवटकर, मूर्तीजापूर, जि.सोलापूर. ---------- १५
४ टिश्यू पेपर कादंबरीत प्रकटणाऱ्या हॉटेल व्यवसायातील मोरीमध्ये काम करणाऱ्या स्त्रीयांच्या समस्या एक वास्तवबोध - डॉ.बंडू चौधरी, लाखनी ---------- १९
५ भारतीय अर्थकारणामध्ये ग्रामीण विकास संकल्पनेची सद्यस्थिती
- डॉ.चंद्रशेखर फरकांडे नागपूर, ---------- २३
६ 'एक थोर वीरांगना' : महाराणी दुर्गावती - प्रा.चेतना कामडी, राजुरा, जि.चंद्रपूर. ---------- २८
७ दलित - आंबेडकरवादी साहित्याचे बदलते स्वरूप : काही निरीक्षणे
- प्रा.दिनेश गुजर, बुटीबोरी ---------- ३२
८ गडचिरोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांची पिक विम्या विषयीची अनास्था
- १) श्री. दीपक सहारे, मूलचेरा; २) डॉ.उत्तमचंद कांबळे, गडचिरोली ---------- ३६
९ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा महिला समस्येविषयी दृष्टीकोण
- १) प्रा.प्रतिभा दुबे, ब्रह्मपुरी, २) डॉ.आर.एम.झाडे ---------- ४०
१० आधुनिक काळात प्राचीन इतिहास लेखनाचे महत्त्व - डॉ.गजानन ठक, हिंगणघाट ---------- ४४
११ समकालीन ग्रंथालय आणि त्याची समाजातील भूमिका
- डॉ.आशिष द्राणेकर, खैरी, रामटेक ---------- ४८
१२ भद्रावती तालुक्यातील आदिवासी व बिगर आदिवासी भागातील प्राथमिक शाळांच्या विविध योजनांचा व त्यांच्या आर्थिक स्त्रोतांचा अभ्यास - प्रा.नितीन लांजेवार, २) प्रा.किशोर हुमने ---------- ५३
१३ मराठी वाङ्मयातील विज्ञान साहित्य प्रवाह : एक चिकित्सक अभ्यास (इ.स.२००० नंतरचे विज्ञान साहित्य कादंबरी) - डॉ.जयश्री सातोकर, भंडारा. ---------- ५८
१४ शबरी घरकुल योजनेचा आदिवासींच्या सामाजिक व आर्थिक स्थितीवर होणाऱ्या सकारात्मक परिणामांचा अभ्यास (विशेष संदर्भ चंद्रपूर जिल्ह्यातील भद्रावती तालुका)
- १) डॉ.नितीन लांजेवार, २) डॉ. एन. जी. उमाटे, भद्रावती ---------- ६२
१५ बुलढाणा जिल्ह्यातील गोलंजारा जमातीच्या युवकांमध्ये शासनाच्या रोजगार हमी योजनेच्या निकषांप्रति जागरूकता - एक चिकित्सक अध्ययन - १) प्रा.महेंद्र चव्हाण, भद्रावती, २) डॉ.एन.जी. उमाटे ६८
१६ गडचिरोली जिल्ह्यातील अतिसंवेदनशिल भागातील आदिवासी जमातींमधील रोजगाराची साधने
- १) डॉ.नितीन चौधरी, गडचिरोली. २) डॉ.अनिरुद्ध गचके ---------- ७५
१७ महाराष्ट्रातील दलितांच्या समस्या व समकालीन चळवळी. आकलनात्मक अभ्यास
- डॉ.प्रभाकर भैसारे, सुरतोली, ता.देवरी, जि.गोंदिया ---------- ७७
१८ दलित-आंबेडकरवादी मराठी कवितेचे बदलते स्वरूप - प्रा.प्रमोद नारायणे, वर्धा ---------- ८२

# दलित–आंबेडकरवादी मराठी कवितेचे बदलते स्वरूप

प्रा. प्रमोद नारायणे
सहयोगी प्राध्यापक
मराठी विभाग, यशवंत महाविद्यालय, वर्धा
भ्रमणध्वनी ९८५०३०९६६५

सारांश :

मराठी साहित्यक्षेत्रात १९६० नंतर महत्त्वाच्या साहित्यप्रवाहांची भर पडली. या साहित्यप्रवाहांत दलित, ग्रामीण, जनवादी, स्त्रीवादी, शिक्षणवादी, आदिवासी इत्यादी साहित्यप्रवाहांचा समावेश आहे. या साहित्यप्रवाहाने नव्या जाणिवांचा आणि नव्या अशयाभिव्यक्तीचा साहित्यप्रत्यय दिला. सुरुवातीच्या कालखंडात या साहित्यप्रवाहाने मूलगामी स्वरूपाची मांडणी केली. १९६० नंतर टप्प्याटप्प्याने हे साहित्य बदलत गेले. मुख्यत्वेकरून दलित–आंबेडकरवादी कविता आणि स्वकथने या वाङ्मयप्रकारांनी जागतिक साहित्यविश्वात नवा आणि वैशिष्ट्यपूर्ण आशय लेखनबद्ध केला. सामाजिक जीवनजाणिवांना प्रखरपणे उद्धृत करणारा लेखनप्रकार म्हणून दलित–आंबेडकरवादी कवितेने वेगळी ओळख निर्माण केली. ही कविता जाणिवेच्या पातळीवर वास्तववादी ठरली. जगाचे व्यवहारविश्व जसजसे बदलत गेले, तसतसे या साहित्यप्रवाहात विविधप्रकारचे स्थित्यंतरे झाली. जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरणाने जागतिक व्यवहारात नवी बाजारमूल्ये प्रस्थापित करायला सुरुवात केली. या बदलत्या परिस्थितीने साहित्याचा परीघ व्यापला गेला. दलित–आंबेडकरवादी कवितेने या सर्वच बाबींची मुख्यत्वाने दखल घेतली. बदलत्या जागतिक रूपाचे अनुकूल व प्रतिकूल परिणाम दलित–आंबेडकरवादी कवितेकडून काटेकोरपणे टिपले गेले आणि या परिणामाला आकरूप दिले. समाजात जसजशी नवनवी स्थित्यंतरे घडत गेली, तसतशी दलित–आंबेडकरवादी कविता बदलत गेली. या कवितेने मानवी जीवनमूल्यांची ठामपणे प्रस्थापना करण्याचे कार्य केले. या कवितांनी नव्या आव्हानांना कवितेच्या परीघपटलावर आणले. मानवी जीवन विद्रूप करणाऱ्या अवमूल्यीत गोष्टींना त्यांनी नकार दिला. विद्रोहाचा पुकार करीत या व्यवस्थेच्या विरोधात पेटून उठण्याची भाषा केली. आज दलित–आंबेडकरवादी कवितेची तिसरी व चौथी पिढी लिहिती झाली आहे. १९६०च्या काळातील अनेक कवी आता पडद्याआड गेले आहेत. नव्या पिढीने नवमूल्य प्रस्थापनेची जबाबदारी समर्थपणे सांभाळली आहे. बदलत्या काळात दलित–आंबेडकरवादी कवितासुद्धा नव्या जाणिवांसह व नव्या आशयांसह बदलत आहे. या कवितेला नवनवीन धुमारे फुटत आहेत. ही कविता अधिक समृद्ध आणि वैश्विक होत असल्याचे एकूणच कवितांचा विचार करता लक्षात आल्याशिवाय राहत नाही.

संकेतशब्द :

१. आंबेडकरवादी, जनवादी, ग्रामीण
२. नव्या जाणिवा, नवे आशयविश्व
३. वैश्विकता, समृद्धता
४. आशय आणि अभिव्यक्तीची एकार्थता
५. नवी आव्हाने, नवे धुमारे

प्रस्तावना :

१९६० च्या कालखंडात मराठी साहित्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणात उलथापालथ घडून आली. मराठी साहित्यात नवनवे प्रवाह उदयास येऊ लागले. हे वाङ्मय प्रवाह चळवळीतून जन्मास आले होते. या प्रवाहांना सामाजिक, सांस्कृतिक आणि वैचारिक अधिष्ठान होते. आंबेडकरवादी साहित्य हे आद्य बंडखोर असल्याचे नाव. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आंदोलक व्यक्तिमत्त्वाने व विचारसामर्थ्याने चलचित्रित झालेल्या या प्रवाहाने मराठी साहित्यातच नव्हे, तर जागतिक पटलावर आपले नाव कोरले आहे आणि विश्वसाहित्याच्या पटलावर स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व सिद्ध केले. कथा, कादंबरी, नाटक, कविता, स्वकथन, प्रवासवर्णन, वैचारिक निबंध इत्यादी साहित्यप्रकारांच्या विविध प्रांतांत वैशिष्ट्यपूर्ण परिवर्तन घडवून आणण्याचे काम या साहित्यप्रवाहाने केले. मराठी साहित्याला जागतिक उंची मिळवून देण्याचे मोलाचे कार्य आंबेडकरवादी साहित्यामुळे झाले आहे हे निर्विवाद सत्य आहे. महाराष्ट्रात या साहित्याची निर्मिती झाली आणि मराठीत नव्या साहित्ययुगाला प्रारंभ झाला. विद्रोह, क्रांती, परिवर्तन या मूल्यांचा उच्चार साहित्यातून होऊ लागला. या साहित्यामुळे हजारो वर्षे मुकी असलेली वाचा बेधडकपणे बोलू लागली. मानवी हक्काची जाणीव कलेद्वारे करून दिली जाऊ लागली. आज या साहित्याच्या निर्मितीपासून साठ वर्षांचा काळ लोटला आहे. एकविसाव्या शतकात

 ISSN No. 2394-5990

जगासमोर असंख्य आव्हाने उभी ठाकली आहेत. या आव्हानांना उत्तरे देत आंबेडकरवादी साहित्य पुढे पुढे निघाले आहे. दलित-आंबेडकरवादी साहित्याचे स्वरूप बदलत आहे. प्रस्तुत निबंधातून दलित-आंबेडकरवादी कवितेचे बदलत गेलेल्या स्वरूप याविषयीचा परामर्श घेण्याचा प्रयत्न करावयाचा आहे.

**दलित-आंबेडकरवादी कविता :**

दलित-आंबेडकरवादी साहित्यिकांनी आपल्या अभिव्यक्तीसाठी अनेक साहित्यप्रकारांना अवलंब केला. त्यात कवितेचा प्रकर्षाने उल्लेख करावा लागतो. आंबेडकरवादी जाणिवेचे दर्शन कवितेमधून मुख्यत्वाने होत असल्याने हाच मध्यवर्ती प्रवाह म्हणून मानला जातो. आंबेडकरवादी कविता प्रखर जीवनानुभवातून निर्माण झालेली आहे. तरीसुद्धा "जीवनानुभव आणि ही कविता यांच्या अगोदरही एक महत्त्वाचा टप्पा आहे, तो नव जागृत आत्मभानाने निर्माण केलेल्या जीवनानुभवाकडे पाहण्याच्या पूर्वनिश्चित विचारप्रधान दृष्टिकोणाचा."[1] ही कविता वास्तव जगणे रेखाटणारी कविता आहे. त्यामुळे या कवितेच्या जाणिवा परिपक्व आहेत. भूतकाळ, वर्तमानकाळाचा वेध घेणारी ही कविता दुःख आणि वेदना यांचा आविष्कार करते. या कवितेला निराशा माहिती नाही. भविष्यकाळाची अत्यंत ऊर्जस्वल अशी स्वप्ने तिने रंगविली आहेत. सामाजिक समतेची, मानवमुक्तीची, विश्वबंधुत्वाची गाणी तिला मुखोद्गत झाली आहेत. दुःख, वेदना, विद्रोह, नकार, विज्ञान, क्रांती, आशावाद ही सुरुवातीपासूनच आंबेडकरवादी कवितेची आशयविशेष बनून आली आहेत. आंबेडकरवादी कविता नव्या ज्वलंत संस्कारातून जन्माला आली. तिच्यात परिवर्तनवादी जाणिवांचा अंगार होता. माणसाला विद्रूप करणाऱ्या संस्कृतीचा या कवितेनी धिक्कार केला. "एका बाजूने या जाणिवा माणुसकीची विटंबना करणाऱ्या सर्व मूल्यांना, संस्कृतीला, परंपरांना, संस्कारांना, प्रथापंथाना बेदरकार आणि संपूर्ण नकार देत होत्या आणि दुसऱ्या बाजूने माणसांमध्ये भेद करणार नाही, अशा मानवी संस्कृतीचे स्वप्न त्या उरात फुलवित होत्या."[2] समतेची प्रतिष्ठापना करू पाहणाऱ्या या कवितेनी क्रांतीची बिजे फुलवित विषमतेचा नाश करण्याची भाषा वापरली.

सध्या आंबेडकरवादी कविता साठोत्तरी, नव्दोत्तरी, असे टप्पे पार करीत एकविसाव्या शतकाच्या प्रवासाला निघाली आहे. या कवितेचा साठ वर्षांचा प्रवास मोठा लक्षवेधी आहे. एकविसाव्या शतकात निर्माण झालेल्या अनेक आव्हानांना सामोरे जात त्यानुसार आशयाच्या कक्षा रुंदावत याही शतकात आपले समकालिनत्व टिकवून ठेवण्यास ही कविता सज्ज झाली आहे. दलित-आंबेडकरवादी कवितेचे बदलते स्वरूप पुढीलप्रमाणे लक्षात घेता येतील.

**जागतिकीकरणाने बदललेल्या परिस्थितीचे संदर्भ :**

